सकाळ

# विद्यापीठात आजपासून फुले-शाहू-आंबेडकर सप्ताह

## व्याख्यान, गोलमेज परिषद, वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन

**कोल्हापूर, ता. ८ :** शिवाजी विद्यापीठाचा हीरक महोत्सव आणि राजर्षी शाहू महाराज स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाचे आयोजन केले आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या उपस्थितीत शनिवारी (ता. ९) सकाळी साडेदहा वाजता मानव्यशास्त्र सभागृहात उद्घाटन होणार आहे, अशी माहिती केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली.

शनिवारी हैदराबादच्या भविष्य निर्वाह निधीचे आयुक्त डॉ. हेमंत तिरपुडे यांच्या 'प्रियदर्शी सम्राट अशोक यांचे कल्याणकारी राज्य' या व्याख्यानाने सुरुवात होईल. रविवारी (ता. १०) डॉ. पंजाबराव देशमुख स्मृतिदिनानिमित्त प्रा. अंबादास मोहिते (अमरावती) यांचे 'डॉ. पंजाबराव देशमुख यांचे समाज परिवर्तनाचे कार्य' विषयावर ऑनलाईन व्याख्यान होईल. सोमवारी (ता. ११) महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त डॉ. छाया पवार यांचे 'महात्मा ज्योतिराव फुले यांचे मानवतावादी साहित्य' विषयावर व्याख्यान होईल. मंगळवारी (ता. १२) 'आंबेडकरी विचाराने प्रेरित सामाजिक व राजकीय चळवळी' यावर राजर्षी शाहू स्मृती गोलमेज परिषद आहे. बुधवारी (ता. १३) केंद्रात महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व स्पर्धा होणार आहेत. गुरुवारी (ता. १४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंतीनिमित्त डॉ. सुरेंद्र जोंधळे (पुणे) यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाहीविषयक विचार' यावर राजर्षी शाहू सिनेट सभागृहात व्याख्यान आहे. तिथेच वक्तृत्व स्पर्धेचे बक्षीस वितरण होईल.

Times of India

# NCC awards SUK VC with 'Hon Col' rank

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The headquarters of the National Cadet Corps (NCC) has conferred the vice-chancellor of Shivaji University with the 'Honorary Colonel' rank.

NCC group commander Brigadier Sameer Salunkhe said, "Honorary Colonel Dr D T Shirke is the first from a non-agricultural university in Maharashtra to receive this coveted rank. Total sixteen VCs from across the country were recommended for the post. However, only six of them were approved, in which two vice-chancellors are from Maharashtra - SUK vice-chancellor Dr D T Shirke and VC Balasaheb Sawant Konkan Agricultural University in Dapoli Dr Sanjay Sawant."

"NCC is playing a vital role in producing trained and patriotic citizens. SUK has always encouraged NCC and we will take care that the NCC students who drop out of the examinations due to various camps and other activities will not be at a loss academically," said Dr Shirke. This ceremony was held at the SUK vice-chancellor's office.

0 9 APR 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजर्षी शाहूंच्या कर्तृत्वावरील ग्रंथ उपयुक्त

## सुहासिनीदेवी घाटगे; प्रा. बी. डी. खणे लिखित इंग्रजी भाषेतील ग्रंथाचे प्रकाशन

कोल्हापूर, ता. ८ : ''इतिहास लेखक प्रा. डॉ. बी. डी. खणे यांनी लिहिलेला 'राजर्षी शाहू छत्रपती ऑफ कोल्हापूर' या ग्रंथातून शाहू महाराजांचे कार्यकर्तृत्व देशविदेशातील वाचकांसमोर येणार आहे. हा ग्रंथ अभ्यासकांसाठी उपयुक्त ठरेल.'' असे मत सुहासिनीदेवी घाटगे यांनी आज येथे केले. 'राजर्षी शाहू छत्रपती ऑफ कोल्हापूर' या इंग्रजी ग्रंथाचे प्रकाशन श्रीमती घाटगे यांच्या हस्ते आज येथे झाले. यावेळी त्या बोलत होत्या. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. खणे म्हणाले, ''राजर्षी शाहू महाराज कुशल प्रशासक होते. त्यांचे इंग्रजीवर उत्तम प्रभुत्व होते हे पत्रव्यवहारावरून दिसते. त्यांचे अनेक पत्रव्यवहार वाचले, संस्थानकालीन कागदपत्रे अभ्यासली, विदेशातील त्यांनी केलेले पत्र व्यवहार, धोरणात्मक निर्णयांचा अभ्यास केला,




**कोल्हापूर : प्रा. डॉ. बी. डी. खणे लिखित 'राजर्षी शाहू छत्रपती ऑफ कोल्हापूर' या ग्रंथाचे गुरुवारी प्रकाशन करताना श्रीमती सुहासिनीदेवी घाटगे, सुरेश रोटे. डॉ. डी. टी. शिर्के, प्रा. डॉ. अशोक चौसाळकर आदी.**

यातून हा ग्रंथ तयार झाला आहे.''

शाहू महाराजांवर मराठीमध्ये यापूर्वी अनेक ग्रंथ आलेत. देशविदेशात सामाजिक क्षेत्रात अभ्यास करणाऱ्या व्यक्ती आहेत. अशा व्यक्तीपर्यंत राजर्षी शाहू महाराजांचे कार्य पोहचवावे, त्यासाठी ग्रंथ इंग्रजीमध्ये लिहिला आहे. हा ग्रंथ जगभरातील सर्वच विद्यापीठांना देण्यात येणार आहे. असेही डॉ. खणे यांनी सांगितले.

प्रा. डॉ. अशोक चौसाळकर म्हणाले, ''राजर्षी शाहू महाराजांचे कार्यकर्तृत्व जगासमोर आणण्यात शिवाजी विद्यापीठाचा वाटा मोलाचा आहे. यापूर्वी अनेकांनी शाहू महाराजांच्या कार्याला उजाळा देणारे लेखन केले. त्या मालिकेत डॉ. खणे यांच्या ग्रंथाचीही भर पडली आहे. राजर्षी शाहू महाराजांचे कार्यकर्तृत्व सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. अशा लोकांपर्यंत हेही या ग्रंथातील लेखन पोहचावे, यासाठी हा ग्रंथ मराठी भाषेत वाचकांपुढे यावा.''

जैन बोर्डिंगचे संचालक सुरेश रोटे, प्रा. सुनील मगदूम, प्राचार्य विलास पवार आदी उपस्थित होते.

### बापूसाहेब घाटगे दुर्लक्षित

बापूसाहेब घाटगे यांच्यावरील कार्यकर्तृत्वाची इतिहासात अपेक्षित दखल घेतली नाही. यापुढील काळात डॉ. खणे यांना कागलच्या बापूसाहेब महाराज यांच्या कर्तृत्वाला उजाळा देणारे लेखनही करावे लागणार आहे, अशी खंत व अपेक्षा सुहासिनीदेवी घाटगे यांनी व्यक्त केली.

09 APR 2022 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा सांस्कृतिक संघ पंजाबला रवाना



कोल्हापूर : फगवाडा येथे रवाना होणाऱ्या संघासमवेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. आर.व्ही. गुरव, व्यवस्थापन परिषद सदस्य आदी.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आझादी का अमृतमहोत्सव आणि शिवाजी विद्यापीठ हीरक महोत्सवी वर्ष अशा संयुक्त कार्यक्रमाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठामार्फत सांस्कृतिक आदानप्रदान उपक्रम आयोजित केला आहे. या अंतर्गत लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, फगवाडा, जालंधर (पंजाब) या विद्यापीठात १० ते १४ एप्रिल या कालावधीत विविध संयुक्त सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले आहेत. त्यात सहभागी होण्यासाठी शिवाजी विद्यापीठाचा ४३ सदस्यीय संघ फगवाडाकडे (पंजाब) रवाना झाला.


उपक्रमामध्ये दोन्ही विद्यापीठांचे कलाकार एकत्रितरीत्या विविध कलाप्रकार सादर करतील. यात महाराष्ट्राची लोकधारा (वासुदेव, गोंधळ, आराधी, भारुड), लोकवाद्यवृंद, लोकनृत्य, लावणी, कव्वाली, सुगम गायन, मूकनाट्य, आदी कार्यक्रमांचा समावेश आहे. विद्यापीठाचा संघ एकूण ४३ सदस्यांचा आहे. यात संघ व्यवस्थापक, व्यवस्थापन परिषद सदस्य, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक, युवा महोत्सव समिती सदस्य व प्रशासकीय सेवक यांचा समावेश आहे.

दरम्यान, या कार्यक्रमाची रंगीत तालीम शिवाजी विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात मंगळवारी सायंकाळी (दि. ५) पार पडली. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह व्यवस्थापन परिषदेचे सदस्य उपस्थित होते. कुलगुरूंनी संघातील विद्यार्थ्यांशी संवाद साधून उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.

0 9 APR 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा संघ रवाना

## सांस्कृतिक आदान प्रदान उपक्रमांत पंजाबमध्ये होणार कार्यक्रम



कोल्हापूर : फगवाडा येथील कार्यक्रमासाठी रवाना होणाऱ्या संघासमवेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव आणि व्यवस्थापन परिषद सदस्य आदी.

कोल्हापूर, ता. ८ : आझादी का अमृत महोत्सव आणि शिवाजी विद्यापीठाच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त विद्यापीठातर्फे सांस्कृतिक आदान प्रदान उपक्रमांतर्गत लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीत (फगवाडा, पंजाब) विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले आहेत. त्यात सहभागी होण्यासाठी विद्यापीठाचा ४३ सदस्यांचा संघ रवाना झाला.

उपक्रमामध्ये १० ते १४ एप्रिल दरम्यान दोन्ही विद्यापीठांचे कलाकार एकत्रित विविध कलाप्रकार सादर करतील. महाराष्ट्राची लोकधारा (वासुदेव, गोंधळ, आराधी, भारूड इ.), लोकवाद्यवृंद, लोकनृत्य, लावणी, कव्वाली, सुगम गायन, मूकनाट्य, देशभक्तीपर लघुनाटिका, देशभक्तीपर सुगम गायन यांचा समावेश आहे. राग यमन कल्याणवर आधारित विविध भाषांतील, विविध प्रकारांतील जवळपास वीस गाण्यांचे मुखडे सादर करण्यात येणार आहेत. गाण्यांच्या माहितीचे सादरीकरणही करण्यात येणार आहे. ४३ सदस्यांचा विद्यापीठाचा संघ आहे. विद्यार्थ्यांसह संघ व्यवस्थापक, व्यवस्थापन परिषद सदस्य, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक, युवा महोत्सव समिती सदस्य व प्रशासकीय सेवकांचा समावेश आहे. कार्यक्रमाची रंगीत तालीम वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात झाली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह व्यवस्थापन परिषदेचे सदस्य उपस्थित होते. कुलगुरूंनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून शुभेच्छा दिल्या.

सकाळ

# इतिहास संशोधनाकडे व्यापक दृष्टीने पहा : डॉ. मोरे

कोल्हापूर, ता. ८ : "धर्म, जात, पंथ, विशिष्ठ विचारश्रेणी, गाव आणि इतर घटकबाबतची मानवी अस्मिता तीव्र झाली आहे. अलीकडे व्यापक दृष्टिकोन होण्याऐवजी तो संकुचित होत चालला आहे. ज्ञान क्षेत्रात तर तो अधिक घातक आहे. इतिहासातील संशोधनाकडे तर व्यापक दृष्टीने पाहिले पाहिजे," असे मत शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागातील डॉ. नंदकुमार मोरे यांनी व्यक्त केले.

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात 'संशोधन पद्धती आणि तंत्रे' यावर एकदिवसीय चर्चासत्र झाले. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण अध्यक्षस्थानी होते. इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. सुरेश शिखरे यांनी उद्घाटन सत्राचे स्वागत केले. प्रा. डॉ. सरोज पाटील यांनी आभार मानले. प्रा. डॉ. राजकिरण बिरजे यांनी सूत्रसंचालन केले. पहिल्या सत्रात शिवाजी विद्यापीठाचे इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. अवनिश पाटील, दुसऱ्या सत्रात डॉ. निरंजन कुलकर्णी, तिसऱ्या सत्रात डॉ. बी. एस. माळी, चौथ्या सत्रात प्रा. पांडुरंग अमबले, डॉ. मुदित मुजावर, डॉ. कविता गगराणी यांनी मार्गदर्शन केले.

प्रा. एस. डी. अपराध, प्रा. डॉ. एस. डी. जाधव, डॉ. जी. बी. पाटील, प्रा. एम. टी. धनवडे, प्रा. उमाकांत हत्तीकर यासह विविध पन्नास महाविद्यालयातील संशोधकांनी सहभाग नोंदवला. नॅक समन्वयक डॉ. एन. एस. यांनी आभार मानले.



कोल्हापूर : श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातील चर्चासत्रात बोलताना डॉ. नंदकुमार मोरे.

पुण्यनगरी

# फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहास उद्या प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा हीरक महोत्सव आणि राजर्षी शाहू महाराज स्मृतिशताब्दी वर्ष या निमित्ताने शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू पी. एस. पाटील व प्रभारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे यांच्या उपस्थितीत शनिवारी सकाळी १०.३० वा. मानव्यशास्त्र सभागृहात सप्ताहाचे उद्घाटन होणार आहे. ही माहिती डॉ. आंबेडकर केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली.

0 9 APR 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आजपासून फुले-शाहू-आंबेडकर सप्ताह

## मान्यवरांची व्याख्याने, गोलमेज परिषद, वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा हीरक महोत्सव व राजर्षी शाहू महाराज स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राने फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाचे आयोजन केले आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते व प्र- कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या उपस्थितीत शनिवारी (दि. ९) सकाळी १०.३० वाजता मानव्यशास्त्र सभागृहात या सप्ताहाचे उद्घाटन होईल, अशी माहिती डॉ. आंबेडकर केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली.

हैदराबादच्या भविष्य निर्वाह निधीचे आयुक्त डॉ. हेमंत तिरपुडे यांच्या 'प्रियदर्शी सम्राट अशोक यांचे कल्याणकारी राज्य' या विषयावरील व्याख्यानाने शनिवारी सप्ताहाची सुरुवात होईल. रविवारी (दि. १०) सकाळी १०.३० वाजता डॉ. पंजाबराव देशमुख स्मृतिदिनानिमित्त प्रा. अंबादास मोहिते (अमरावती) यांचे 'डॉ. पंजाबराव देशमुख यांचे समाज परिवर्तनाचे कार्य' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान होईल.



सोमवारी (दि. ११) सकाळी १०.३० वा. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त डॉ. छाया पवार यांचे 'महात्मा ज्योतिराव फुले यांचे मानवतावादी साहित्य' या विषयावरील व्याख्यान मानव्यशास्त्र सभागृहात होईल. मंगळवारी (दि. १२) सकाळी १०.३० वाजता मानव्यशास्त्र सभागृहात 'आंबेडकरी विचाराने प्रेरित सामाजिक व राजकीय चळवळी' या विषयावर राजर्षी शाहू स्मृती गोलमेज परिषद आयोजित केली आहे. बुधवारी (दि. १३) सकाळी १०.३० वाजता महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांची वक्तृत्व स्पर्धा विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रात होणार आहे.

गुरुवारी (दि. १४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंतीनिमित्त डॉ. सुरेंद्र जोंधळे (पुणे) यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाहीविषयक विचार' या विषयावर राजर्षी शाहू सिनेट सभागृहात सकाळी १०.३० वाजता व्याख्यान होईल. वक्तृत्व स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाने या सप्ताहाचा समारोप होईल, अशी माहिती डॉ. महाजन यांनी दिली.

लोकमत

# राजेंद्र रायकर यांना उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा अधिकारी पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क



**कसबा बावडा :** डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी व जिमखाना विभागप्रमुख प्रा. डॉ. राजेंद्र रायकर यांना शिवाजी विद्यापीठाच्यावतीने उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार प्रदान करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत राबवलेल्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमाची दखल घेत शिवाजी विद्यापीठामध्ये कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के व राष्ट्रीय सेवा योजनेचे महाराष्ट्र राज्य संपर्क अधिकारी डॉ. प्रशांतकुमार वनंजे यांच्या हस्ते त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचा संघ पंजाबला रवाना

## कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडून शुभेच्छा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, फगवाडा, जालंधर (पंजाब) विद्यापीठात १० ते १४ एप्रिल या कालावधीत विविध संयुक्त सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले आहेत. त्यात सहभागी होण्यासाठी शिवाजी विद्यापीठाचा ४३ सदस्यीय संघ फगवाडाकडे रवाना झाला आहे.

आझादी का अमृत महोत्सव व शिवाजी विद्यापीठाचे हीरक महोत्सवी वर्ष अशा संयुक्त कार्यक्रमाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठामार्फत सांस्कृतिक आदान-प्रदान उपक्रम आयोजित केला आहे. या उपक्रमात दोन्ही विद्यापीठांचे कलाकार एकत्रितरीत्या विविध कलाप्रकार सादर करतील. यात महाराष्ट्राची लोकधारा (वासुदेव, गोंधळ, आराधी, भारुडइ.); लोकवाद्यवृंद, लोकनृत्य, लावणी, कव्वाली, सुगम गायन, मूकनाट्य, देशभक्तीपर लघुनाटिका, देशभक्तीपर सुगम गायन इ. कार्यक्रमांचा समावेश आहे. राग यमन कल्याणवर आधारित विविध भाषांतील, विविध प्रकारांतील जवळपास वीस गाण्यांचे मुखडे सादर करण्यात येणार आहेत. कार्यक्रमाची रंगीत तालीम विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात झाली. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह व्यवस्थापन परिषदेचे सदस्य उपस्थित होते. त्यानंतर कुलगुरूंनी संघातील विद्यार्थ्यांशी संवाद साधून शुभेच्छा दिल्या.



कोल्हापूर : फगवाडा (पंजाब) येथील विद्यापीठात सांस्कृतिक आदान-प्रदान उपक्रमांतर्गत सादरीकरणासाठी रवाना होणाऱ्या संघासमवेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. आर. व्ही. गुरव, व्यवस्थापन परिषद सदस्य आदी.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात आजपासून 'फुले-शाहू-आंबेडकर' सप्ताह

## व्याख्याने : गोलमेज परिषद, वक्तृत्व स्पर्धा होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा हीरक महोत्सव आणि राजर्षी शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्ष यानिमित्ताने विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे फुले-शाहू-आंबेडकर सप्ताह होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आज, शनिवारी सकाळी साडेदहा वाजता मानव्यशास्त्र सभागृहात सप्ताहाचे उद्घाटन होणार आहे.

हैदराबादच्या भविष्य निर्वाह निधीचे आयुक्त डॉ. हेमंत तिरपुडे यांच्या 'प्रियदर्शी सम्राट अशोक - यांचे कल्याणकारी राज्य' या विषयावरील व्याख्यानाने सप्ताहाची सुरुवात होईल. रविवारी सकाळी साडेदहा वाजता डॉ. पंजाबराव देशमुख स्मृतिदिनानिमित्त प्रा. अंबादास मोहिते (अमरावती) यांचे 'डॉ. पंजाबराव देशमुख यांचे समाज परिवर्तनाचे कार्य' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान होईल. सोमवारी (११ एप्रिल) सकाळी साडेदहा वाजता महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त डॉ. छाया पवार यांचे 'महात्मा ज्योतिराव फुले यांचे मानवतावादी साहित्य' या विषयावरील व्याख्यान होईल. मंगळवारी (१२ एप्रिल) सकाळी साडेदहा वाजता 'आंबेडकरी विचाराने प्रेरित सामाजिक व राजकीय चळवळी' या विषयावर राजर्षी शाहू स्मृती गोलमेज परिषद होणार आहे.

बुधवारी सकाळी साडेदहा वाजता महाविद्यालयीन, विद्यापीठीय विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व स्पर्धा विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रात होतील. गुरुवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंतीनिमित्त डॉ. सुरेंद्र जोंधळे यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाहीविषयक विचार' या विषयावर राजर्षी शाहू सिनेट सभागृहात सकाळी साडेदहा वाजता व्याख्यान होणार आहे. या समारंभाने सप्ताहाचा समारोप होणार असल्याची माहिती डॉ. आंबेडकर केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली.

0 9 APR 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरू डॉ. शिर्के यांना एनसीसीचे कर्नलपद बहाल

## एनसीसीचे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर समीर साळुंखे यांची माहिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

राष्ट्रीय छात्र सेनेच्या राष्ट्रीय मुख्यालयामार्फत मानद कर्नलपद कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना बहाल करण्यात आले, अशी माहिती एनसीसीचे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर समीर साळुंखे यांनी दिली.

ते म्हणाले, नवी दिल्ली येथील एनसीसी मुख्यालयाला मानद कर्नलपदासाठी गतवर्षी देशभरातून सोळा कुलगुरूंच्या नावांची शिफारस केली होती. त्यापैकी सहा नावांना मंजुरी मिळाली. त्यामध्ये राज्यातील शिवाजी विद्यापीठाचे डॉ. शिर्के आणि दापोली येथील कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत यांचा समावेश आहे.



कोल्हापूर : एनसीसीच्या मानद कर्नलपदाचा बॅज कुलगुरू डॉ. शिर्के यांना प्रदान करताना ब्रिगेडियर समीर साळुंखे व कर्नल डी. एस. सायना.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाने नेहमीच एनसीसीला प्रोत्साहन दिले आहे. छात्रांनी सशस्त्र सैन्यदलात जावे, यासाठी सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड परीक्षांसाठी सुविधा केल्याचे सांगितले. ब्रिगेडियर साळुंखे यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. शिर्के यांना मानद कर्नलपदाचे बॅज आणि एनसीसी बॅटन प्रदान केले. कॅप्टन डॉ. सुधाकर खोत यांनी स्वागत केले. कॅप्टन सुनिता भोसले यांनी आभार मानले.

शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी.टी. गायकवाड, मेजर डॉ. ए. एन. बसुगडे यांनी नियोजन केले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह एनसीसी, कोल्हापूर ग्रुपचे ट्रेनिंग ऑफिसर लेफ्टनंट कर्नल समीर मोहिते, लेफ्टनंट कर्नल एस. बी. सरनाईक, कर्नल डी. एस. सायना, कर्नल एस. गणपती, कर्नल मंजुनाथ हेगडे, कर्नल विजयन थोरात यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

0 9 APR 2022
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाविद्यालयांनी क्षमता ओळखून वृद्धिंगत कराव्या

## शिवाजी विद्यापीठात प्राचार्यांच्या बैठकीत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे आवाहन

प्रतिनिधी
कोल्हापूर

नजीकच्या काळात शैक्षणिक क्षेत्राला नव्या धोरणासह अनेकविध बदलांना सामोरे जावे लागणार आहे. त्यासाठी महाविद्यालयांनी आपल्या क्षमता ओळखून त्या अधिक वृद्धिंगत करण्याकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी आज केले.

शिवाजी विद्यापीठातील प्राचार्यांच्या बैठकीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण केव्हाही लागू होऊ शकते. त्या दृष्टीने विद्यापीठ तयार आहे. महाविद्यालयांनीही तयारीत राहावे. मात्र, या धोरणापलिकडेही अनेक नवनव्या अभ्यासक्रम, योजना, उपक्रम आणि मूल्यमापनाच्या अभिनव पद्धती विद्यापीठ अनुदान आयोगाच्या माध्यमातून येत आहेत. या बदलांचा नियमित आढावा घेण्यासाठी आणि त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी महाविद्यालयस्तरावर एक स्वतंत्र कक्ष निर्माण करावा. युजीसीकडून वेगवेगळे मसुदे वेबसाईटवर ठेवले जातात. त्यांच्याविषयी चर्चा करून महाविद्यालयांनी आपली मते, सूचना, अभिप्राय युजीसीला द्यायला हवेत. ॲकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट्स (एबीसी) मुळे विद्यार्थी कोणत्याही विद्याशाखेतील असला तरी त्यांच्या आवडीचे अभ्यासक्रम शिकण्याची मुभा आहे. विद्यार्थी ५० टक्क्यांपर्यंतचे क्रेडिट्स प्राप्त करू शकतात. त्यामुळे आपणही अन्य ठिकाणच्या विद्यार्थ्यांना आवडतील अशा अभ्यासक्रमांची निर्मिती करण्याची गरज आहे. ज्या विषयात आपण सक्षम आहोत, ते अधिक उत्तम व दर्जेदार पद्धतीने विकसित करा. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी आपल्या स्वागत व प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. प्राचार्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित प्राचार्यांच्या बैठकीत मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.

0 9 APR 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समाजोपयोगी संशोधनाकडे लक्ष द्यावे : कुलगुरू डॉ. शिर्के

## प्राणिशास्त्र विभागात कार्यशाळेचा समारोप

**सकाळ वृत्तसेवा**

**कोल्हापूर, ता. ८ :** शिवाजी विद्यापीठातील संशोधकांनी अधिकाधिक समाजोपयोगी संशोधनाकडे लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी येथे केले. विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागातर्फे झालेल्या'मॉलिक्युलर टेक्निक्स इन बायोलॉजिकल रिसर्च' विषयावरील कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यूजीसी स्ट्राईड कार्यक्रमांतर्गत कार्यशाळा झाली.

डॉ. शिर्के म्हणाले, 'विद्यापीठाचे मूलभूत संशोधनाच्या क्षेत्रात नाव आहे. विज्ञान, सामाजिक विज्ञान अशा सर्वच विद्याशाखांत संशोधनाचे कार्य गतीने आणि चांगले सुरू आहे. तरीही आता सामाजिक उपयोजनाच्या दृष्टिकोनाची संशोधन कार्याशी सांगड घालण्याची आवश्यकता आहे.'



**कोल्हापूर : कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.**

सीएसआयआर-एनसीएल, पुणे येथील गोपाळ कल्लुरे यांनी 'पीसीआर व ॲग्रोस जेल इलेक्ट्रोफोरेसीस' विषयावर व्याख्यान व प्रात्यक्षिक दिले. तेथीलच शारदा मोहिते यांनी 'एसडीएस-पेज' विषयावर प्रात्यक्षिक दाखविले.

संजय घोडावत विद्यापीठातील स्कूल ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेसचे डॉ. अभिनंदन पाटील यांनी 'प्रॉब सोनिकेटर व ल्योफिलायझर', विभागप्रमुख डॉ. ए. ए. देशमुख यांनी 'आयडेन्टीफिकेशन ऑफ प्रोटीन लोकॅलायझेशन बाय इम्युनोसायटोकेमिस्ट्री,' बंगळूर येथील लॉरेन्स ॲन्ड मेयो इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे वरिष्ठ संशोधक पद्मनाभन रवी यांनी 'प्रिन्सिपल ऑफ लाइट ॲन्ड डार्क फिल्ड मायक्रोस्कोपी' विषयावर माहिती दिली.

तरुण भारत




कसबा बावडा : कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के व राष्ट्रीय सेवा योजनेचे महाराष्ट्र राज्य संपर्क अधिकारी डॉ. प्रशांतकुमार वनंजे, विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना डॉ. राजेंद्र रायकर.

# प्रा. डॉ. रायकर यांना 'उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी' पुरस्कार

प्रतिनिधी
कसबा बावडा

डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी व जिमखाना विभाग प्रमुख प्रा. डॉ. राजेंद्र रायकर यांना शिवाजी विद्यापीठ यांच्या वतीने उत्कृष्ठ कार्य केल्याबद्दल उत्कृष्ठ कार्यक्रम अधिकारी पुरस्कार प्रदान करण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत राबवलेल्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमाची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के व राष्ट्रीय सेवा योजनेचे महाराष्ट्र राज्य संपर्क अधिकारी डॉ. प्रशांतकुमार वनंजे यांच्या हस्ते या पुरस्काराचे डॉ. रायकर यांना वितरण करण्यात आले.

यावेळी प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक अभय जायभाये तसेच सर्व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी व शिक्षक उपस्थित होते. हा पुरस्कार मिळवण्यासाठी डॉ. रायकर यांना डी. वाय. पाटील संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय डॉ. डी. वाय. पाटील (दादासाहेब) यांचे आशीर्वाद व संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील उपाध्यक्ष नाम. सतेज उर्फ बंटी डी. पाटील, विश्वस्त आम. ऋतुराज पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन व कार्यकारी संचालक डॉ. अनिलकुमार गुप्ता, प्राचार्य डॉ. संतोष चेडे, अधिष्ठाता डॉ. अद्वैत राठोड, डॉ. प्रमोद चौगुले व डॉ. राहुल पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले. डॉ. रायकर यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.